# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

विषय–फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२३परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत SARAL Database वरुन भरावयाची आहेत.

व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी,पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र(Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Creditघेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची** फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Databaseवरुनऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा. | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत व्यवसाय अभ्यासक्रम(HSC vocational Stream) शाखांचे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer ofCreditघेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनने भरावयाच्या तारखा. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| नियमित शुल्क | शनिवार दि.१.१०.२०२२ ते शुक्रवार दि.२१.१०.२०२२ | शनिवार दि.२२.१०.२०२२ ते शनिवार दि.०५.११.२०२२ |

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGSद्वारे भरणा करणे व RTGS/NEFT पावती/ चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख नंतर कळविण्यात येईल याची सर्व शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

अ) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज Loginमधून Pre-listउपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी.सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

ब) इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. शासन निर्णय क्र.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणकदि.१४/०८/२०१७ नुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठमहाविद्यालयांकडून ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Databaseमध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे. सदर Saral Dataवरुनच नियामित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

२. व्यवसाय अभ्यासक्रम (Hsc Vocational)शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांची माहिती Saral Dataमध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं.३ नुसार) निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

३. नियमित शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक :–२९.०९.२०२२

क्र.कोविमं/१२ वी परीक्षा/ 1896
दिनांक :- २९/०९/२०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय - फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने फेब्रुवारी/मार्च २०२३ **मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेच्या ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करावया बाबतच्या वरील पत्राची नोंद घेऊन त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.**

(दत्तात्रय शंकर पोवार)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर